# प्रेसनोट

## नेताजी सुभाषचंद्र बोस जंयती

जा.क्र. ४६/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २३/०१/२०१८

**भंडारा**:– पोलीस नियंत्रण कक्ष भंडारा येथील प्रांगणात आज दि. २३/०१/२०१८ रोजी मा. पोलीस अधिक्षक भंडारा विनीता साहू, यांच्या मार्गदर्शनाखाली अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर, पोलीस उपअधिक्षक(गृह) कुलकर्णी, उपविभागीय पोलीस अधिकारी नागरे यांच्या अध्यक्षतेखाली नेताजी सुभाषचंद्र बोस यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करुन जयंती साजरी करण्यात आली. त्यांचे जिवण चारीत्र्य व कार्यप्रणालीबाबत माहीती देण्यात आली.

संपूर्ण नाव– सुभाषचंद्र जानकीनाथ बोस जन्म तारीख– २३/०१/१८९७, जन्म स्थान– कटक(ओरीसा), आई – प्रभावतीदेवी जानकीनाथ बोस, शिक्षण– इ.स. १९१९ मध्ये बी. ए., इ.स.१९२० मध्ये आ.सी.एस. परिक्षा उत्तीर्ण, कार्य– इ.स. मध्ये १९२१ मध्ये त्यांनी सरकारी नौकरीतील अत्यंत मानाच्या जागेचा त्याग करुन स्वातंत्र्याच्या आदोलनात उडी घेतली. स्वातंत्र्य लढ्यात भाग घेण्यासाठी आपले नौकरीचा राजीनामा देणारे ते पहीलेच आ.सी.एस. अधिकारी होते. भारताच्या लढ्यासाठी सुभाष बाबुंनी हिटलरशी चर्चा केली. व जर्मनीमध्ये आझाद हिंद रेडीओ केंद्र सुरु केले. या केंद्रावरुन इंग्रजाविरुध्द राष्ट्रव्यापी उठाव करण्याचा संदेश ते भारतीयांना देवू लागले. सन १९४३ च्या आक्टोंबर महिन्यात सुभाष बांबुच्या अध्यक्षते खाली आझांद हिंद सरकार स्थापन झाले. व अंदमान निकोबार बेटावर आझाद हिंद सरकारने तिंरगा ध्वज फडकविला. अंदमानाला शहिद बेट व निकोबारला स्वराज्य बेट असे नावे दिली. डॉ. लक्ष्मी स्वामीनाथन हया झाशीची राणी पथकाच्या प्रमुख होत्या, तिंरगा ध्वज हे 'आझाद हिंद सेनेचे निशान' जयहिंद हे अभिवादनाचे शब्द चलो दिल्ली हे घोष वाक्य तंर 'कदम से बढायेजा' हे समरगीत होते. ग्रथ संपदा– इंडीयन स्ट्रगल पुरस्कार– भारत सरकारने १९९२ साली सुभाष बाबुना **'भारत रत्न'** हा सर्वोच्च सन्मान जाहीर केला. परंतु बोस कुंटुबीयांनी तो स्विकारण्यास नकार दिला. अशा वीर पुरुषांची आज आपण जंयती साजरी करीत आहोत.

यावेळी कार्यक्रमाला पोनी. कदम नियत्रंण कक्ष अधिकारी, पोनी. गाडे वानीशा भंडारा, सपोनी. कदम मानवी संसाधन विभाग भंडारा, पोउपनी. तुळजेवार, पोउपनी. पंधरे श्वान पथक, पोउपनी. देशमुख बी.डी.डी. एस, राखीव पोलीस निरीक्षक पोनी. वर्मा, उपनिरीक्षक प्रधान, पोलीस शाखेचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

**(पो.नी एस.बी.कदम)**
**नियत्रंण कक्ष अधिकारी पोलीस**
**भंडारा**
**दुरध्वनी.क्र. ७०४५८४२१११**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.